**सं.फौ.ख.क्र.१०७०/२०१९**
**निशाणी क्र.४७**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.८ यांची जबानी**

मी याव्दारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

**नांव** – आप्पासो सर्जेराव गोडसे
**वय** – ६३ वर्षे, **धंदा** – सेवानिवृत्त
**राहणार** – तरडफ, ता. फलटण, जि. सातारा

**सरतपासणी सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री.पी.व्ही.महाले यांच्यामार्फत सुरु**

१. दि.११.०४.२०१९ रोजी मी फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन येथे सहाय्यक पोलीस फौजदारी म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी अपराध क्र.१९०/२०१९ चा तपास ठाणे अंमलदार पाडवी यांनी गुन्हा दाखल करुन लेखी आदेशाने तपास माझ्याकडे देण्यात आला. आता मला दाखविण्यात आलेला लेखी आदेश तोच आहे. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. **लेखी आदेशास नि.४८** देण्यात येते. तपासाकामी मला खबरी जबाबा, एफ.आय.आर. व ऑकरन्स रिपोर्ट इत्यादी कागदपत्रे मिळाली होती. मी कागदपत्रांचे अवलोकन केले.घडले गुन्हयाचे ठिकाणी मी गेलो. घटनास्थळ फिर्यादी गोरख रणवरे यांनी दाखवले. मी दोन पंचसमक्ष घटनास्थळाचा तयार केला. घटनास्थळ हे १५ फाटा, सुरवडी फिर्यादी गोरख रणवरे यांचे घराजवळ मोकळया जागी चिंचेच्या झाडाजवळ झाडापासुन दक्षिणेस ६.५ फुट अंतरावर तसेच हणमंत पोपट जाधव यांचे घरापासुन उत्तरेस १४.५ फुट अंतरावर आहे. आता मला नि.३३ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. हा तोच आहे. त्यावर माझ्या व दोन पंचांच्या सह्या आहेत. घटनास्थळाच्या पूर्वेला फिर्यादीची विहीर व मोकळी जागा आहे. पश्चिमेला निरा उजवा कालवा कॅनॉल, उत्तरेस फिर्यादीचे राहते घर, दक्षिणेला हणमंत जाधव यांचे राहते घर आहे. घटनास्थळावरुन मी विटेचा तुकडा जप्त केला होता. आता मला न्यायालयातील सी.एम.आर. क्र.१६/२०२० मध्ये जमा असलेली आर्टिकल अ वरील वीट दाखवण्यात आली. ती तीच वीट आहे. जप्त मुद्देमाल हा मुद्देमाल पावती तयार करुन मुद्देमाल कारकुनाकडे जमा केला. आता मला मुद्देमाल पावती दाखवण्यात आली. ही तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. **मुद्देमाल पावतीस नि.४९** देण्यात येते. त्यानंतर साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे सांगण्याप्रमाणे त्यांचे तपासटिपण नोंदवले, ते कागदपत्रांत सामील केले. फिर्यादीने वैद्यकीय प्रमाणपत्र आणून दिले होते. ते दोषारोपपत्रात सामील केले. आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी क्र.१ न्यायालयात हजर आहे. (*निशाणी क्र.४६ वरील आदेशानुसार आरोपी क्र.२ ची आजची गैरहजेरी ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर माफ करण्यात आली आहे.*)

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.श्री.व्ही.व्ही.फरांदे यांचेमार्फत उलटतपास सुरु**

२. मी ३६ वर्ष सेवेत होतो. त्यामुळे मला गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया, तपास प्रक्रिया याबद्दल सर्व माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कागदावर बघुन घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगितल्या आहेत. दि.११.०४.२०१९ रोजी मला लेखी आदेश प्राप्त झाला. हे म्हणणे खरे आहे की, या गुन्ह्यातील फिर्यादी गोरख रणवरे यांनी या गुन्ह्यातील आरोपी हनुमंत जगताप यांना खोऱ्याच्या

दांडयाने मारहाण केली म्हणून गु.र.नं.१५८/२०१९ हा फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या गुन्ह्याचा तपास दि.३१.०३.२०१९ रोजी माझ्याकडे आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या गुन्ह्याचा तपास करुन त्यातील आरोपींविरुध्द मी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्या गुन्ह्याचा तपास माझ्याकडे आल्यामुळे व मी तो तपास केल्यामुळे सदर गुन्ह्याचा तपास माझ्याकडे देवू नका असे मी माझ्या वरिष्ठांना तोंडी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्ह्याचा तपास निःपक्षपातीपणे केला नाही. गुन्हा दि.३१.०३.२०१९ रोजी घडला होता व मी घटनास्थळ पंचनामा दि.१२.०४.२०१९ रोजी केला. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा घडल्यानंतर १२ दिवसांनी मी घटनास्थळाचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१.०३.२०१९ रोजी जशी परिस्थिती होती तशी परिस्थिती दि.१२.०४.२०१९ रोजी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ ही खुली जागा आहे, तेथे कोणीही येवू जावू शकते. गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळ पंचनामा करेपर्यंत त्याठिकाणी कोणीही गेले असेल व जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाचे दोन्ही पंच हे फिर्यादीचे जवळचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ज्या लोकांचे तपासटिपण मी नोंदवले ते साक्षीदारसुध्दा फिर्यादीच्या जवळचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीशी संगनमत करुन मला तपास करण्याचा कोणताही अधिकार नसताना मी आरोपीविरुध्द खोटे चार्जशिट दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१.०३.२०१९ ते दि.११.०४.२०१९ पर्यंत फिर्यादी कोठे होता, काय करत होता याचा तपास मी केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोषारोपपत्रातील कागदपत्रांमध्ये फिर्यादी दि.३१.०३.२०१९ ते दि.११.०४.२०१९ पर्यंत कोठे होता याबाबतची नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला गु.र.नं.१५८/२०१९ मध्ये मदत करण्यासाठी आरोपींविरुध्द खोटा गुन्हा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकूर खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी बेकायदेशीररीत्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर जावून खोटा तपास केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/-

**ठिकाण** : फलटण श्रीमती.जे.एस.खेडकर–गोयल

**दिनांक** : २१.०१.२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फलटण.**